# चाकांचा शोध

अनुप रे

अनुवाद : राहुल कोसम्बी



ISBN 978-81-237-5602-8


प्रथम प्रकाशन : 2009 (*शके* 1931)
पहिली आवृत्ती : 2012 (*शके* 1934)
दुसरी आवृत्ती : 2013 (*शके* 1935)

मूळ © अनुप रे, 2004
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

The Comming of Wheels *(English Original)*
Chakancha Shodh *(Marathi)*

**₹ 30.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.
Website : www.nbtindia.gov.in




# चाकांचा शोध

अनुप रे

अनुवाद

राहुल कोसम्बी




nbt.india

एकः सूते सकलम्


नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

अरे बापरे! कित्ती अवघड काम! कित्ती जड हे सामान! सामान नेता-नेता मुंग्या आपपसात बोलायच्या.




‘‘कधी संपणार हे काम?’’ एका दमलेल्या मुंगीने विचारले.


‘‘का नाही! आपण लांब काठ्यांचा उपयोग करू हे सामान न्यायला!’’ एक हुशार मुंगी म्हणाली.



“दमले बाबा! ओढायला खूप ताकद लागते,” दुसरी मुंगी म्हणाली.



‘‘सगळ्यांनी एकदमच सामान उचलूया,’’ राणी मुंगी म्हणाली. पण तरीही सगळे दमलेच.



मग त्यांनी ठरवले की लाकडी ओंडक्याच्या गोल-गोल चकत्या कराव्या. त्यावरून सामान ढकलत न्यावे. पण ढकलता-ढकलता सगळ्यांची पुरी दमछाक झाली.




ढकलून ढकलून सगळे दमले. मग एक मुंगी म्हणाली, "आपण या फिरत्या चकत्यांवरती लाकडाची फळी टाकू, कित्ती मज्जा!"



“जाड फळीला चकत्या घट्ट बसवू.”
आणखी एक मुंगी म्हणाली.




आणि मग एक छान हातगाडी बनली.




व्वा! कित्ती सोपं झालं सगळं! आता हे जड सामान ओढायचं नाही की ढकलायचं नाही. सगळ्या मुंग्या आनंदाने ओरडल्या.

मुंग्यांनी गाडीमध्ये नवीन बदल केले. आता त्यांनी मोठ्या चकत्या आणि फळ्या वापरल्या. चकत्यांना त्यांनी आऱ्या बनवल्या.

आता चकत्या नीट फिरू लागल्या. आवाजही कमी झाला. आता मुंग्या चकत्यांना चाके म्हणू लागल्या.






मुंग्यांनी नव-नवीन प्रकारच्या गाड्या बनवल्या.
त्या खूप वेगाने धावायच्या.


नंतर वाफेच्या इंजिनाचा शोध लागला. वाफेच्या इंजिनालाही चाके बसवली. त्यांना डबे जोडले. त्यांनी आगगाडी बनवली. ''कू ऽऽ... कू ऽऽ...झूक...झूक...!'' आगगाडी खूप वेगाने धावायची. सगळ्यांच्या गावी जायची.




आता त्यांनी चारचाकी मोटरगाडी बनवली. मुंगीराणी गाडीत बसून सगळीकडे फिरू लागली. पों...पों...पों...कित्ती मज्जा!''





आज सगळे जगच चाकांवर धावत आहे. विद्युत चाके...मोटरगाडीची चाके... घड्याळे...यंत्रांची चाके...सगळीकडे फिरती चाके...!




मोजा पाहू! आपले डोकेसुद्धा गर्रगरायला लागेल...चाकासारखे!!!







Printed at Pushpak Press Pvt. Ltd., Okhla, New Delhi-110020



nbt.india
एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 30.00
ISBN 812375602-X
9 788123 756028
13140533